**Series : EFGH/S**

**Set – 4**

| प्रश्न-पत्र कोड Q.P. Code | 8/S |
|---|---|

**रोल नं.**
**Roll No.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

परीक्षार्थी प्रश्न-पत्र कोड को उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर अवश्य लिखें।
Candidates must write the Q.P. Code on the title page of the answer-book.

# मराठी
# MARATHI

*वेळ : **3** तास* — *गुण : **80***

*निर्धारित समय : **3** घण्टे* — *अधिकतम अंक : **80***

*Time allowed : **3** hours* — *Maximum Marks : **80***

- प्रश्नपत्रिकेत **11** छापील पाने आहेत; कृपया तपासून घ्या.
- प्रश्नपत्रिकेत **8** छापील प्रश्न आहेत; तपासून घ्या.
- प्रश्नपत्रिकेच्या उजवीकडे छापलेला कोड नंबर उत्तरपुस्तिकेच्या मुखपृष्ठावर लिहा.
- ***उत्तरे लिहताना प्रश्न क्रमांक दिलेल स्थानवर अवश्य लिहा.***
- प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी **15** मिनिटे देण्यात आलेली आहेत. प्रश्नपत्रिका 10.15 वाजता वाटण्यात येईल. 10.15 ते 10.30 या दरम्यान प्रश्नपत्रिका फक्त वाचायची आहे; उत्तरे लिहायला सुरुवात करू नये.
- Please check that this question paper contains **11** printed pages.
- Q.P. Code given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- Please check that this question paper contains **8** questions.
- **Please write down the Serial Number of the question in the answer-book at the given place before attempting it.**
- 15 minute time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the candidates will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

#

*General Instructions :*

(i) *This question paper is divided into 4 sections.*
(ii) *It has total 8 Questions.*
(iii) *Section A : 2 Questions No. 1 to 2*
(iv) *Section B : 2 Questions No. 3 to 4*
(v) *Section C : 3 Questions No. 5 to 7*
(vi) *Section D : 1 Question No. 8 to 8*
(vii) *Attempt questions as per specific instructions.*
(viii) *Write question no. in answer book before attempting it.*

*सामान्य सूचना :*

(i) *ही प्रश्नपत्रिका 4 विभागात विभागलेली आहे.*
(ii) *प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण 8 प्रश्न आहेत.*
(iii) *विभाग A / अ मध्ये 2 प्रश्न आहेत. प्रश्न क्र. 1 ते 2*
(iv) *विभाग B / ब मध्ये 2 प्रश्न आहेत. प्रश्न क्र. 3 ते 4*
(v) *विभाग C / क मध्ये 3 प्रश्न आहेत. प्रश्न क्र. 5 ते 7*
(vi) *विभाग D / ड मध्ये 1 प्रश्न आहेत. प्रश्न क्र. 8*
(vii) *दिलेल्या निर्देशानुसार प्रश्नांची उत्तरे लिहा.*
(viii) *उत्तर लिहिण्यापूर्वी उत्तरपुस्तिकेत प्रश्न क्रमांक लिहा.*

**विभाग – 'अ' : वाचन व आकलन (15 गुण)**

**Section – 'A' : Reading and Comprehension (15 Marks)**

**1.** खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

अपयशाची अनेक कारणे आहेत जसे – अज्ञान, अक्षमता, दृढनिश्चयाचा अभाव, ध्येयाप्रती उत्साहाचा अभाव. परंतु, तुमच्या पराभवासाठी इतरांना दोष देऊ नका. व्यक्तीने निर्भयपणे आपले ध्येय निश्चित केले पाहिजे, आणि पूर्ण आत्मविश्वासाने व धैर्याने ते साध्य करण्यासाठी प्रयत्न सुरू केले पाहिजेत. तुम्ही नक्कीच यशस्वी व्हाल. आपल्यात लपलेल्या कलागुणांना ओळखा आणि त्यांचा समाजाच्या हितासाठी वापर करा. परिश्रम व समर्पणाने यश मिळते. शिवाय प्रामाणिकपणे प्रयत्न केले तर त्यापासून कोणीही वंचित राहू शकत नाही.

जीवनभरात कोणतेही मोठे काम करण्यासाठी स्वत:वर विश्वास ठेवणे, आपल्या आई-वडिलांचा, शिक्षकांचा आणि देशाचा आदर करणे अत्यंत आवश्यक आहे. माणसाने प्रत्येक काम शांत आणि आनंदी मनाने केले पाहिजे, जगात कठोर परिश्रमाला पर्याय नाही. जोपर्यंत स्वत:वरचा विश्वास जिवंत

आहे तोपर्यंत यश अजिंक्य नाही, मग आपण जगातील कोणत्याही उंचीला स्पर्श करू शकतो. आज मानसशास्त्राच्या क्षेत्रात भावनांवर जास्त भर आहे. मानसशास्त्र सांगते की मनुष्य जो काही विचार करतो ते संस्कार त्याच्या अवचेतनात पोसतात आणि तेच संस्कार कालांतराने त्याच्या प्रवृत्तीचा आणि वर्तनाचा भाग बनतात.

(a) वरील गद्यउतारा वाचून त्याआधारे खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायांमधून निवडा. (कोणतेही – 3) *3×1=3*

(i) तुमच्या कोणत्या गोष्टीसाठी इतरांना दोष देऊ नका ?

(A) विजयासाठी (B) पराभवासाठी

(C) स्वार्थासाठी (D) कामासाठी

(ii) व्यक्तीने निर्भयपणे आपले काय निश्चित केले पाहिजे ?

(A) उद्दिष्ट (B) हेतू

(C) स्वप्न (D) ध्येय

(iii) जगात कोणत्या कठोर गोष्टीला पर्याय नाही ?

(A) निर्णयाला (B) शब्दाला

(C) परिश्रमाला (D) आचरणाला

(iv) मानसशास्त्राच्या क्षेत्रात कशावर जास्त भर आहे ?

(A) भावनांवर (B) मनावर

(C) बुद्धीवर (D) आनंदावर

(b) वरील गद्यांशाच्या आधारे पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही – 3) *3×1=3*

(i) लपलेल्या कलागुणांचा वापर कोणासाठी करावा ?

(ii) अपयशाची कोणती कारणे वरील उताऱ्यात आली आहेत ?

(iii) यश केव्हा मिळते ?

(iv) प्रत्येक काम माणसाने कशा पद्धतीने केले पाहिजे ?

(c) वरील गद्यांशाच्या आधारे पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही – 1) *1×2=2*

(i) जीवनात मोठे काम करण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी आवश्यक आहेत ?

(ii) मानसशास्त्र काय सांगते ?

**2.** खालील कविता काळजीपूर्वक वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा.

माझ्या गोव्याच्या भूमीत
    गड्या नारळ मधाचे
कड्या कपाऱ्यांमधून
    घट फुटती दुधाचे
माझ्या गोव्याच्या भूमीत
    आंब्या-फणसाची रास
फुली फळांचे पाझर
    फळी फुलांचे सुवास
माझ्या गोव्याच्या भूमीत
    उन्हाळ्यात खारा वारा
पावसात दारापुढे
    सोन्या-चांदीच्या रे धारा

(a) कविता वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा. (कोणतेही – 3) *3×1=3*

(i) गोव्याच्या भूमीतील कोणते फळ मधासारखे गोड आहे ?

(A) नारळ (B) काजू
(C) फणस (D) आंबा

(ii) कड्या-कपारीतून कशाचे घट फुटतात ?

(A) मधाचे (B) दुधाचे
(C) पाण्याचे (D) रसाचे

(iii) फळांमधून कशाचा सुवास येतो ?

(A) मातीचा (B) पावसाचा
(C) फुलांचा (D) पानांचा

(iv) गोव्यात उन्हाळ्यात कोणता वारा वाहतो ?

(A) मतलई (B) खारा
(C) उष्ण (D) शीत

(b) वरील कवितेच्या आधारे खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही – 4) *4×1=4*

(i) पावसाच्या धारांना कवीने कशाची उपमा दिली आहे ?

(ii) गोव्यात कोणकोणत्या फळांची रास दिसून येते ?

(iii) फुलांना कशाचे पाझर फुटतात ?

(iv) वरील काव्यात कवीने कोणकोणत्या ऋतूंचे वर्णन केले आहे ?

(v) वरील कवितेत कवीने कोणत्या भूमीचे वर्णन केले आहे ?

## विभाग – 'ब' : व्याकरण (20 गुण)

## Section – 'B' : Grammar (20 Marks)

**3.** (a) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही – 4) *4×1=4*

(i) पुढील नामांतून विशेष नामाचा योग्य पर्याय निवडा.

(A) दिनेश (B) सोने

(C) लाकूड (D) क्रौर्य

(ii) खालीलपैकी योग्य विधाने कोणती ?

(अ) सर्वनामांऐवजी वाक्यात नामांचा वापर केला जातो.

(ब) विशेषण वाक्यांतील नाम व सर्वनामांबद्दल विशेष/अधिक माहिती सांगतो.

(क) सर्वांसाठी वापरले जाणारे नाम म्हणजे सर्वनाम.

(ड) वस्तू, व्यक्ती, पदार्थ यांच्या नावाला नाम असे म्हणतात.

(A) अ, ब बरोबर; क, ड चूक (B) क, ड बरोबर; अ, ब चूक

(C) अ, क बरोबर; ब, ड चूक (D) ब, ड बरोबर; अ, क चूक

(iii) खालीलपैकी गटात न बसणारे वाक्य कोणते ?

(A) मोकळा वेळ मिळाल्यावर मनोज वाचन करतो.

(B) अवघड परिस्थितीवर मात करून चिन्मय यशस्वी झाला.

(C) पक्ष्यांनी उंच झाडावर घरटे बांधले.

(D) आईने स्वयंपाक केला.

(iv) पुढील वाक्यात रिकाम्या जागी योग्य त्या शब्दयोगी अव्ययाचा वापर करा.

सोहनच्या घरा ________ वडाचा डेरेदार वृक्ष आहे.

(खाली, पासून, समोर, वर)

(v) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

राधाने <u>त्याच्यावर</u> नजर रोखली.

(A) भाववाचक नाम (B) विशेष नाम

(C) सर्वनाम (D) सामान्य नाम

(b) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही – 3) *3×1=3*

(i) चारुदत्तने चहाची टपरी सुरू केली. (वाक्याचा काळ ओळखा.)

(ii) एकादशीनिमित्त आईने उपास धरला आहे. (भविष्यकालीन वाक्य तयार करा.)

(iii) अमेरिकेत खूपच थंडी पडली होती. (वर्तमानकालीन वाक्य तयार करा.)

(iv) वसंत ऋतूत झाडांना नवी पालवी फुटेल. (भूतकालीन वाक्य तयार करा.)

(c) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही – 3) *3×1=3*

(i) दिवाळीसाठी अनुजाने हिऱ्याची अंगठी खरेदी केली का ? (वाक्याचा प्रकार ओळखा.)

(ii) त्याने काढलेले चित्र उत्तम प्रकारे रंगवले. (उद्गारार्थी वाक्य तयार करा.)

(iii) रमेश फोन मधले नको असलेले सगळे फोटो डिलीट करतो. (आज्ञार्थी वाक्य तयार करा.)

(iv) शिखाने पटकन अभ्यास संपवला. (विधानार्थी नकारार्थी वाक्य तयार करा.)

(d) सूचनेनुसार उत्तरे लिहा. (कोणतेही – 2) *2×1=2*

(i) खालीलपैकी निश्चितपणे अनेकवचनी शब्द कोणता ते ओळखा.

(A) बहीण (B) शेळी

(C) खांब (D) भिंत

(ii) गादी उचलून वर ठेव.

(अधोरेखित शब्दाच्या वचनामध्ये बदल करून वाक्य पुन्हा लिहा.)

(iii) 'ओळी' – या शब्दाचे वचन बदला.

**4.** (a) सूचनेनुसार उत्तरे लिहा. (कोणतेही – 2) *2×1=2*

(i) पुढीलपैकी भिन्नलिंगी शब्दाचा योग्य पर्याय ओळखा.

(A) सखा (B) देव

(C) लेखक (D) सेविका

(ii) लिंगविचारानुसार गटात न बसणारा शब्द ओळखा.

(A) चित्र (B) झाड

(C) विद्यालय (D) उत्सव

(iii) पुढील शब्दांतील नपुंसकलिंगी शब्द कोणता ?

(A) कविता (B) प्रयोग

(C) गीत (D) निंदा

(b) सूचनेनुसार उत्तरे लिहा. (कोणतेही – 2) *2×1=2*

(i) खालीलपैकी समानार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती ?

(A) मेघ = आभाळ (B) शालीन = नम्र

(C) वायू = वमन (D) धरपड = धरपकड

(ii) खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता ?

(A) क्रोध (B) चीड

(C) रावा (D) राग

(iii) खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता ?

(A) चंद्र (B) मकर

(C) शशी (D) सुधांशु

(c) सूचनेनुसार उत्तरे लिहा. (कोणतेही – 2) *2×1=2*

(i) खालीलपैकी विरुद्धार्थी शब्दाची योग्य जोडी कोणती ?

(A) मोफत × विकत (B) तन × मन

(C) एकदा × लाखदा (D) घात × अपघात

(ii) 'मानवता' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द पुढील पर्यायांतून निवडा.

(A) अमानवता (B) दानवता

(C) दानशूरता (D) सावधानता

(iii) 'प्रांत' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द पुढील पर्यायांतून निवडा.

(A) प्रदेश (B) विदेश

(C) परदेश (D) परप्रांत

(d) सूचनेनुसार उत्तरे लिहा. (कोणतेही – 2) *2×1=2*

(i) खालीलपैकी समास प्रकारांच्या गटात न बसणारा शब्द कोणता ?

(A) आपुलकी (B) पतिपत्नी

(C) गावोगावी (D) बरेवाईट

(ii) ज्या सामासिक शब्दातील पहिले पद मुख्य असते व दुसरे पद गौण असते तसेच या सामासिक शब्दाचा वापर वाक्यात क्रियाविशेषण अव्ययासारखा केला जातो, त्या समासाला ———— असे म्हणतात.

(A) इतरेतर द्वंद्व समास (B) समाहार द्वंद्व समास

(C) वैकल्पिक द्वंद्व समास (D) अव्ययीभाव समास

(iii) 'षट्कोन' या सामासिक शब्दाचा समास पुढीलपैकी कोणता ?

(A) अव्ययीभाव समास (B) द्विगू समास

(C) वैकल्पिक द्वंद्व समास (D) समाहार द्वंद्व समास

## विभाग – 'क' : पाठ्यपुस्तकावर आधारित (30 गुण)

## Section – 'C' : Based on Textbook (30 Marks)

**5.** (a) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही – 3) *3×1=3*

(i) अब्दुल तपोवनात कोणत्या सणांच्या दिवशी जायचा ?

(ii) निरंजनचा शेवटचा पेपर कोणत्या विषयाचा होता ?

(iii) डॉ. माशेलकरांची आई त्यांना कोणत्या पानांच्या वह्या तयार करून देत असे ?

(iv) 'चरित्र' या साहित्यप्रकाराचा जन्म कसा होतो ?

(v) रेखामावशींच्या जगण्यात कोणत्या गोष्टीला वावच नव्हता ?

(b) खालील वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही – 3) *3×1=3*

(i) या घटनेची ऊब ———— शालीच्या उबेपेक्षा अधिक होती.
(आनंदी, पुलकित, जादुई, ऊबदार)

(ii) ———— बद्दल एक आंतरिक ओढ वाटू लागली.
(आई, शिक्षणा, मामां, शिक्षकां)

(iii) अर्थालंकारांनी माझं अंतरंग सजवून कवी मला अधिक ———— करतात.
(आशययुक्त, आशयपूर्ण, आशयगर्भ, अर्थपूर्ण)

(iv) ———— सर्वात अधिक कॅलरीज असतात.
(साखरेत, तुपात, बटाट्यात, तेलात)

(v) ———— अपघात टाळल्याचं श्रेय त्यालाच देण्यात आलं होतं.
(भयाण, भयंकर, भयानक, भीषण)

(c) खालीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे **40** ते **50** शब्दांत उत्तर लिहा. (कोणतेही – 1) *1×3=3*

(i) रा. ग. जाधव यांनी भिक्षेकऱ्याला किती शाली दिल्या व का ? सविस्तर लिहा.

(ii) डॉ. माशेलकरांना घडविण्यात त्यांच्या आईचे योगदान स्पष्ट करा.

(iii) तंत्रज्ञानाची जोड देऊन अब्दुलचा मुलगा अन्वर बांगड्यांचा व्यवसाय कसा वाढवू शकेल, तुमचे विचार मांडा.

(d) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा खालील वाक्यांमध्ये योग्य त्या ठिकाणी वापर करून वाक्य पुन्हा लिहा. *5×1=5*

(मूठभर मांस वाढणे, कीव येणे, संकोच वाटणे, पुस्ती जोडणे, झोकून देणे)

(i) आईने जेवायला पावभाजी करावी, असे ताईने सुचवताच शंकरने त्याला दुजोरा दिला.

(ii) प्रत्येक वेळी खोटे बोलून शिक्षकांची मर्जी मिळवणाऱ्या सुरेखाची आता मला दया वाटू लागली.

(iii) गणेशोत्सवातील सर्व कार्यक्रमात गौरी पूर्णपणे सहभागी झाली.

(iv) स्वयंपाक उत्तम जमला, असे पाहुण्यांनी म्हणताच ताई स्तुतीने हुरळून गेली.

(v) कमी गुण मिळाल्यावर सतीशला मित्रांमध्ये जायला लाज वाटत होती.

**6.** (a) खालील प्रश्नांची ***एका*** वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही – 4) *4×1=4*

(i) कवी किशोर पाठक काव्यातून कोणाचे स्वप्न साकार करू इच्छितात ?

(ii) देशवासियांमध्ये कशाचे सामर्थ्य नाही ?

(iii) पाडसाची चिंता कोणाला वाटते ?

(iv) कवी सुर्वे जगाच्या शाळेत काय शिकले ?

(v) या हातांनी काय डोलत आहे ?

(vi) कशाच्या पुढे जीवाची शान एवढीशी आहे ?

(b) पुढील वाक्यातील रिकाम्या जागी दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही – 4) *4×1=4*

(i) ———— म्हणे मेघा जैसा। विनवितो चातक तैंसा॥

(तुका, नामा, नाथा, ज्ञाना)

(ii) कधी ———— उंचावलेले, कधी कलम झालेले पाहिले.

(टाचा, माथा, माना, हात)

(iii) तुझी विजयाची ———— डोळे भरून पहावी.

(दौड, धाव, पताका, खेळी)

(iv) या ———— विभव संपदा, जपू वाढवू आम्ही लाखदा.

(दुनियेची, जगाची, विश्वाची, देशाची)

(v) पिलीं पडतांचि ————.

(भूमी, जमिनी, धरती, धरणी)

(c) खालीलपैकी कोणत्याही ***एका*** काव्यपंक्तीचे संदर्भासह स्पष्टीकरण करा. (कोणतेही – 1) *1×3=3*

(i) 'दीनदुबळ्यांचे तुला असे एकच औक्षण.'

(ii) 'भुकेले वत्सरावें, धेनु हुंबरत धांवें'

7. (a) पुढील प्रश्नांची ***एका*** वाक्यांत उत्तरे लिहा. (कोणतेही – 3) *3×1=3*

(i) ‘तूर’ या शब्दाचे कोणते दोन अर्थ व्युत्पत्ती कोशात सांगितले आहेत ?

(ii) प्रचंड स्फूर्तिदायक व्यक्तिमत्त्व कोणाचे ?

(iii) कोणत्या वर्षी पहिल्या व्युत्पत्ती कोशाचे प्रकाशन झाले ?

(iv) पहिल्या आठ-दहा वर्षांपर्यंत कोणती गोष्ट ठीक असते ?

(b) खालीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे **40** ते **50** शब्दांत उत्तर लिहा. *1×2=2*

(i) वरिष्ठांनी डॉ. काकोडकरांच्या कोणत्या मागण्या फेटाळल्या व का ?

(ii) काळाप्रमाणे शब्दांच्या स्वरूपात, अर्थात बदल होतात, ते अपरिहार्य का असतात ?

## विभाग – ‘ड’ : लेखन (15 गुण)

## Section – D : Writing (15 Marks)

8. (a) खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर सुमारे **120** ते **150** शब्दांत निबंध लिहा. *1×6=6*

(आवश्यकतेनुसार मुद्दायांचा आधार घ्या.)

(i) मी तुझी शाळा बोलतेय –

शाळा अस्तित्वात कधी आली – हळूहळू तिची झालेली वाढ – मुलांचा गलका, दंगामस्ती – आनंदाचे क्षण – तिला झालेल्या वेदना, दु:ख – अनेक आठवणी – आजची तिची परिस्थिती – मुलांबद्दल तिला वाटणारे मत – अपेक्षा – मुलांसाठी शिकवण.

(ii) पृथ्वीवरील ऑक्सिजन संपला तर –

पृथ्वीवर सजीव सृष्टी – याची कारणे – आनंद, स्फूर्ती, उत्साहाचे वातावरण – प्राणवायू – जगण्यासाठी ऑक्सिजन – कमी झाल्यास दुष्परिणाम – सृष्टीवर संकट – कारणे व उपाययोजना.

(iii) माझे पहिले भाषण –

शिक्षकांकडून भाषणासाठी नावाची घोषणा – मनातील भिती आणि उत्सुकता – भाषणाची पूर्वतयारी – शिक्षण, नातेवाईकांशी सल्लामसलत – पुस्तकांची व नियतकालिकांची मदत – भाषणाचा दिवस उजाडतो – हृदयाची स्पंदने वाढतात, पाय कापू लागलात – पाठांतर केलेल्या भाषणाचा विसर – आठवेल तेवढे भाषण बोलणे – हृदयाची धडधड थांबते – गुरुजनांकडून कौतुक व शाबासकी.

(b) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कथा लिहून समर्पक शीर्षक व अर्थपूर्ण तात्पर्य लिहा. *1×5=5*

(i) एक टोपीविक्या – गावातून शहराकडे निघणे – वाटेत न्याहारीसाठी थांबणे – तिथेच विश्रांती – झाडावर अनेक माकडे – पेटीतून टोप्या काढून घेणे – टोपीविक्या हैराण – अनेक उपाय – टोप्या परत मिळवणे – तात्पर्य.

**किंवा/OR**

(ii) एक राजकन्या – कथेसाठी हट्ट – झोपत नाही – राजदरबारातील सगळे जण कथा सांगतात – तरी राजकन्या न झोपणे – राज्यात दवंडी – त्यांचीही तीच गत – एका चतुर पंडिताचे आगमन – राजाला अट घालणे – चिमण्यांची कथा – एक-दोन-तीन – कंटाळून राजकन्या झोपी – चतुर पंडित राजाचा जावई – तात्पर्य.

(c) खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर पत्र लिहा. *1×4=4*

(i) राजेश/रजनी बागडे राहणार 859, कसबा पेठ, पुणे 11, येथून पोलीस अधीक्षक, पोलीस आयुक्तालय, पुणे-1 यांना नवरात्रात होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाबाबत तक्रार पत्र लिहीत आहे. (लिफाफा आवश्यक)

(ii) नितीन/नताशा सुभेदार, सरस्वती हायस्कूल, रामबाग कॉलनी, बारामती येथून लॅब असिस्टंट डेपो, शिवनेरी चौक, बारामती यांना प्रयोगशाळेसाठी आवश्यक साहित्याची मागणी करणारे पत्र लिहीत आहे. (लिफाफा आवश्यक)